**महाराष्ट्र शासन**
अन्न, नागरी पुरवठा व ग्राहक संरक्षण विभाग
हुतात्मा राजगुरु चौक, मादाम कामा मार्ग,
मंत्रालय, विस्तार, मुंबई-32.

Email ID : compcell.mhpds@gov.in

---

क्रमांक : संकीर्ण-2023/प्र.क्र.45/सं.क. (E- 624127) दिनांक : 01 जून, 2023

**प्रति,**

1. सर्व जिल्हा पुरवठा अधिकारी,
2. सर्व अन्नधान्य वितरण अधिकारी,
3. सर्व उप नियंत्रक शिधावाटप नागरी पुरवठा, मुंबई.

विषय:- रास्तभाव दुकानस्तरावर लाभार्थ्यांची ई-केवायसी (e-KYC) मोहिम राबविण्याबाबत.
संदर्भ:-केंद्र शासनाचे दि.17.03.2023 रोजीचे पत्र.

राष्ट्रीय स्तरावर जवळपास 99% शिधापत्रिका (किमान एक सदस्य) आणि 95% लाभार्थींचे आधार क्रमांक शिधापत्रिकासोबत संलग्न करण्यात आले आहे. तथापि, शिधापत्रिका व्यवस्थापन प्रणालीमध्ये आधार क्रमांक संलग्न करण्यात आलेल्या शिधापत्रिकांचे आधार क्रमांक प्रमाणीकरण (Validation) कमी असणे ही चिंतेची बाब आहे. त्यामुळे रास्तभाव दुकानदार यांचेस्तरावर बायोमेट्रिक/ आधार प्रमाणीकृत व्यवहारांचे कमी प्रमाण किंवा शिधापत्रिका डाटाबेसमध्ये डुप्लिकेट/ अपात्र शिधापत्रिका लाभार्थींच्या समावेश असण्याची शक्यता आहे. शिधापत्रिकेसोबत संलग्न करण्यात आलेले आधार क्रमांक बरोबर असल्याचे तसेच शिधापत्रिकेमध्ये नमूद असलेल्या व्यक्ती त्याच आहेत याची खात्री करण्यासाठी ई-केवायसी यंत्रणा उपलब्ध करून देण्यात आली असून त्याद्वारे आधार क्रमांक संलग्न शिधापत्रिकेमध्ये नमूद योग्य व्यक्ती असल्याची खात्री होईल. त्यानुसार राज्यातील सर्व रास्तभाव दुकानांवर ई-केवायसी मोहीम हाती घेऊन सदर क्रिया लवकरात लवकर पूर्ण करण्याच्या सूचना केंद्र शासनाने संदर्भाधिन पत्रान्वये दिल्या आहेत. सदर मोहिमेचा उद्देश राज्यातील 100 % लाभार्थ्यांचे ई-केवायसी (e-KYC) प्रक्रीया रास्तभाव दुकानास्तरावर पुर्ण करणे असा आहे.

2. शिधापत्रिकांसोबत संलग्न करण्यात आलेले आधार क्रमांकाचे प्रमाणीकरण पूर्ण करण्यासाठी तसेच ई-केवायसी प्रक्रिया अंमलबजावणी करण्याकरीता केंद्र शासनाने मार्गदर्शक सूचना तयार केल्या असून सदरची प्रत सोबत जोडली आहे. रास्तभाव दुकानस्तरावर e-KYC पडताळणी प्रकीया पुर्ण झाल्यानंतर क्षेत्रीय कार्यालयांनी केंद्र शासनाच्या सुचनांमध्ये मुद्या क्र.3.3 मध्ये नमूद केल्याप्रमाणे कार्यवाही करावी. तसेच ज्या लाभार्थ्यांचे e-KYC पडताळणी झालेली नाही अशा लाभार्थ्यांबाबत मुद्या क्र. 3.2 मध्ये नमूद केल्याप्रमाणे कार्यवाही करावी.

I/104486/2023

शिधापत्रिकांसोबत संलग्न करण्यात आलेले आधार क्रमांकाचे प्रमाणीकरण पूर्ण करण्यासाठी केंद्र शासनामार्फत देण्यात आलेल्या सूचनांनूसार लाभार्थ्यांची ई-केवायसी प्रक्रीया पूर्ण करण्यात यावी, ही विनंती.

Signed by Netra Prashant Mankame
Date: 01-06-2023 14:41:38
Reason: Approved

(नेत्रा मानकामे)

उप सचिव, महाराष्ट्र शासन

1. नियंत्रक, शिधावाटप व संचालक नागरी पुरवठा, मुंबई
2. सर्व उपायुक्त (पुरवठा)
3. निवडनस्ती-सं.क.